# एक दिवसीय शिबीर / शैक्षणिक सहल - गोंदेडा

दिनांक - 26/08/2023

दिनांक 26/08/2023 रोज शनिवारला वाय. एस. पवार कला व वाणिज्य महाविद्यालय, नेरी येथील विद्यार्थ्यांचे एक दिवसीय सहलीचे आयोजन करण्यात आले. सहलीसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज तपोभूमी, गोंदेडा निवडण्यात आले.

सकाळी ठिक 10.00 वाजता सर्वजन महा-विद्यालयातून निघालो आणि ठिक 10.30 वाजता गोंदेडा या ठिकाणी पोहचलो, सहलीसाठी 100 विद्यार्थी तसेंच तसेच प्राध्यापक वर्ग उपस्थीत होते.

गोंदेडा येथे पोहचल्यानंतर विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम स्वयंपाकाची व बसण्याची जागा स्वच्छ केली. मुलींनी सर्वप्रथम कच्चा चिवडा तयार केला सर्वांनी नाश्ता केला व ग्रुपनुसार आपआपल्या कामाची जबाबदारी घेऊन कामाला लागले.

काही विद्यार्थ्यांनी भांडे साफ केले, काहींनी भाज्या कापल्या, काहींनी पाणी आणून दिले, काहींनी काड्या आणल्या, काहींनी स्वयंपाकात मदत केली. काही विद्यार्थ्यांनी पोळ्या केल्या आणि विशेष म्हणजे प्रा. अकमशेख सरांनी स्वयंपाकात खूप मदत केली. अशाप्रकारे सर्वांच्या सहकार्याने स्वयंपाक तयार झाला.

दि. २.०० वाजता विद्यार्थ्यांना जवळच असलेल्या तलावावर श्रमदानासाठी घेऊन गेलेत. तिथे प्रा. श्रीराम सर (रा. से. यो. अ.) प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली व प्रा. लोनबले सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी श्रमदानाचे कार्य केले.

तलावाच्या पाळीजवळ असणारी मोठे मोठी दगड विद्यार्थ्यांनी उचलून बाहेर फेकली. सर्व विद्यार्थ्यांनी श्रमदानाचे कार्य मोठ्या उत्साहाने पार पाडले. सोबतच प्रा. वैद्य सर, प्रा. टेभूर्णे मॅडम यांनी सुद्धा श्रमदान केले.

श्री. सोनवणे सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गोंदेडा येथील लोकांच्या श्रमदानाच्या सहकार्याने तलावाची निर्मिती झाली. आजूबाजूच्या गावातील विद्यार्थी सहलीसाठी गोंदेडा येथे आल्यास तेथे श्रमदान करतात. या संतांच्या सहकार्याने तलावात पाणी साठवून ठेवणे शक्य झाले अशीच आणखी तलावे जंगलात आहेत जेणे करून वन्य-जीवांना पाण्याची मदत व्हावी. गावाचा विकास हेच राष्ट्रसंतांचे ध्येय होते. आणि गोंदेडा येथील नागरीकांनी राष्ट्रसंतांच्या स्वप्नांना त्यांच्या ध्येयांना पुढे नेण्याची महत्त्वाची जबाबदारी स्वीकारली. तलावाच्या काठावर वृक्षारोपणामध्ये कडुलिंबाची झाडे व इतर वृक्षही गावकऱ्यांनी लावले. तलावाच्या काठावर उभे राहिल्यानंतर मन प्रसन्न होऊन जाते. काही वर्षानंतर तलावात नौकाविहार ची सोय सुद्धा उपलब्ध करून देण्यात येईल असे सुद्धा त्यांनी सांगितले.

श्रमदानाच्या माध्यमातून व्यक्तीचा विकास होतो. एकमेकांना मदत करण्याची वृत्ती निर्माण होते. श्रमाचे महत्त्व कळते. म्हणूनच विद्यार्थ्यांनी श्रमदानाचे कार्य

केले पाहीजे अशा प्रकारे मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

दुपारी ठिक ३.०० वाजता भोजनाला सुरवात झाली. सर्वांच्या मदतीने व सहकार्याने भोजनाचा कार्यक्रम संपला.

सर्व विद्यार्थीना बगीच्यात घेऊन गेलोत. विद्यार्थ्यांनी खुप मजा केली. विद्यार्थ्यांना खुप आनंद झाला. तिथे त्यांचे काही बौध्दीक खेळ घेतले व ठिक ५.०० वाजता आपल्या नेरी या गावाला रवाना झाले.

अशा प्रकारे सहल प्रमुख दिक्षांत रामटेके व सहकारी सदस्य पराग चवरे, प्रा. टेम्भूर्णे मॅडम तसेच सहलीला उपस्थीत प्राचार्य डी. एच. वैद्य सर, प्रा. मेहरकुरे सर, प्रा. अक्रम सर, प्रा. ओरीया सर, प्रा. मेश्राम सर, प्रा. बोरकर सर, प्रा. डांगे मॅडम, प्रा. रामटेके मॅडम, प्रा. खंडाळे मॅडम, स्वाती डांगे, दिपक गायकवाड व सर्व महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्या उपस्थीतत एक दिवसीय सहल हा उपक्रम पार पडला.

N.S.S. विभाग प्रमुख | सहल प्रमुख (सहकारी) | प्राचार्य

Shirame

Kamble

[signature]

रासेयो कार्यक्रम अधिकारी
वाय.एस. पवार कॉलेज, नेरी
ता. चिमूर, जि. चंद्रपूर

LECTURER
Y.S. Pawar Arts & Commerce College, Neri

PRINCIPAL
Y. S. Pawar Arts & Commerce Mahavidyalaya, Neri, Tah. Chimur
Dist. Chandrapur